# रहेजा क्यूबीई जनरल इन्शुरन्सकडून कोरोना कवच पॉलिसी सादर

मुंबई : रहेजा क्यूबीई जनरल इन्शुरन्स (आरक्यूबीई)ने नुकतेच 'कोरोना कवच' पॉलिसी सादर केली. ही नवीन आरोग्य पॉलिसी कोविड-१९ साठी उपचार घेणाऱ्या व्यक्तींना हॉस्पिटलमध्ये येणाऱ्या वैद्यकीय खर्चांसाठी विमा संरक्षण देते. स्वतः व्यक्ती, पती/पत्नी, आईवडिल, सासू-सासरे आणि अवलंबून असलेली मुले यांच्यासाठी या पॉलिसीचा लाभ घेता येऊ शकतो.

कोरोना कवच पॉलिसी कोविड संबंधित हॉस्पिटल खर्चासाठी संरक्षण देते, ज्यामध्ये हॉस्पिटलमध्ये भरती होण्यापूर्वी आणि नंतरचा खर्च, होम-केअर उपचार, रूग्णवाहिका व आयुष उपचार यांचा समावेश आहे. या उत्पादनामध्ये ॲड ऑन कव्हरचा (अतिरिक्त प्रिमियम भरल्यास उपलब्ध) समावेश आहे. याअंतर्गत पॉलिसीधारकांना हॉस्पिटलमधील रोजच्या रोख खर्चांसाठी देखील दररोज निश्चित रक्कम देण्यात येईल, जी पॉलिसी कालावधीदरम्यान अधिकतम १५ दिवसांसाठी प्रतिदिन विमाकृत राशीच्या ०.५ टक्के असेल. हे पॉलिसी कव्हरेज साडेतीन महिने, साडेसहा महिने व साडेनऊ महिने या कालावधीसाठी उपलब्ध आहे.

रहेजा क्यूबीई जनरल इन्शुरन्सचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी पंकज अरोरा म्हणाले, ''कोविड-१९ सर्व वयोगटातील लोकांसाठी आव्हान ठरले आहे. सध्या कोविड-१९ महामारीविरोधात सुरू असलेल्या जागतिक संघर्षामुळे अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. अशा आव्हानात्मक काळामध्ये आरोग्याची सुरक्षितता आणि योग्य खबरदारी घेणे अत्यंत महत्त्वाचे बनले आहे. रहेजा क्यूबीई जनरल इन्शुरन्समध्ये आम्हाला कोरोना कवच पॉलिसी सादर करण्याच्या माध्यमातून व्यक्तींच्या जीवनांना साह्य करण्याची संधी मिळाल्याने आनंद होत आहे. आम्ही महामारीविरोधातील या लढ्यामध्ये साह्य करण्याशी कटिबद्ध आहोत. आम्हाला विश्वास आहे की, ही ग्राहक-अनुकूल पॉलिसी सध्याच्या अनपेक्षित काळामध्ये पॉलिसीधारकांना दर्जात्मक व किफायतशीर केअर सुविधा देईल.''